# जिल्हाधिकारी बीड आस्थापनेवरील शिपाई संवर्गातील रिक्त पदे भरतीसाठी लेखी परीक्षेबाबत शुध्दीपत्रक

क्र.२०१०/आस्था/परीक्षा
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड
दिनांक २५.१.२०१०

**शुध्दीपत्रकः-**

दिनांक ३०.१.२०१० रोजी जिल्हाधिकारी आस्थापनेवरील शिपाई पदासाठी लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. या लेखी परीक्षेसाठी पात्र उमेदवारांना पाचारण करुन त्यांना यापूर्वीच लेखी परीक्षेची प्रवेशपत्रे रवाना करण्यात आली आहेत. या प्रवेशपत्रामध्ये सर्वसाधारण सूचना क्रमांक ११ (ड) येथे असे नमूद केले आहे की, प्रश्न पुस्तिकेमध्ये सलग १०० प्रश्न असतील व लेखी परीक्षा २०० गुणांची असेल. या सूचनेमध्ये आता बदल करण्यात आला असून या शुध्दीपत्रकाद्वारे सर्व संबंधितांच्या माहितीसाठी असे कळविले जाते की, दिनांक ३०.१.२०१० रोजी शिपाई पदासाठी होणारी लेखी परीक्षा एकूण ७५ गुणांची असेल व त्यामध्ये ७५ प्रश्नांची प्रश्नपत्रिका उमेदवारांना दिली जाईल. म्हणजेच एका प्रश्नास १ गुण दिला जाईल. असेही कळविण्यात येते की, २५ गुणांची तोंडी परीक्षा घेण्यात येईल. सर्व संबंधितांच्या माहितीसाठी कळविण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी, तथा
अध्यक्ष, जिल्हा निवड समिती
बीड